| Publication: Sakal | Page No - 2 |
| --- | --- |
| Edition: Print | Date: August 16, 2023 |

# 'श्वाब'चे उद्योजक पुरस्कार लवकरच

मुंबई, ता. १५ : श्वाब फाऊंडेशन फॉर सोशल आंत्रप्रेन्युअरशिपच्या या वर्षीच्या उद्योजक पुरस्कारांसाठीच्या नावांची घोषणा लवकरच करण्यात येईल.

जुबिलंट भारतीय फाऊंडेशनच्या भागीदारीने सोशल आंत्रप्रेन्युअरशिप ऑफ द इयर इंडिया अवॉर्ड २०२३ च्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या सहभागींच्या नावांची नुकतीच घोषणा करण्यात आली. पुरस्कारांचे हे चौदावे वर्ष आहे. समाजात चांगले बदल घडवण्यासाठी धडपडणाऱ्या सेवावृत्तीच्या योगदानाची दखल या पुरस्कारातून घेऊन त्यांना सन्मानित करण्यात येते.

सामाजिक असमता, भेदभाव याविरोधात केलेले काम, वंचित गटाचे हाताळलेले प्रश्न तसेच पर्यावरणपूरक बदल घडवण्याची क्षमता या निकषांवर पारितोषिके दिली जातात. पुरस्कार विजेत्यांची निवड मान्यवरांच्या समितीकडून केली जाईल. २५ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीमध्ये पुरस्कार विजेत्याचे नाव जाहीर होईल.